REGISTERED No. B. 3434

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.
प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.  सहामाही : ३ रु.
किरकोळ अंक : ४ आ.

जाहिरातीचे दर :
कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:-
" अर्थ "
" दुर्गाधिवास " पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २० एप्रिल, १९४९ | अंक १६

## हिंद सरकारच्या राष्ट्रीय बचत योजनेतर्फे—

# ★ प्रोजेक्टस् एक्झिबिशन ★

दिनांक—१८ एप्रिल ते ३ मे अखेर

**स्थळ:— एंजि. कॉलेज क्रीडांगण, पुणें** फोन नं. २७३७

**कांहीं वैशिष्ट्यें**

★ घोलपट-शैक्षणिक, औद्योगिक व करमणूक दररोजचे बदलते व विनामूल्य कार्यक्रम.
★ विजेचे पाळणें, चक्रें व इतर नावीन्यपूर्ण करमणुकीचा विभाग.
★ किर्लोस्कर बंधू व इतर नामांकित उद्योगपतींचे प्रेक्षणीय स्टॉल्स, दिल्ली, बनारस, मद्रास, मुंबई, वगैरेचा स्वतंत्र व्यापारी विभाग.
★ हिंदुस्थानचे अर्थ मंत्रि डॉ. जॉन मथाई व उद्योग मंत्रि डॉ. शामाप्रसाद मुकर्जी यांचें खास आगमन व जाहीर संदेश.
★ जनहिताच्या ज्या अनेक सुधारणा सरकारनें हातीं घेतलेल्या आहेत त्यांच्या परिणत स्वरूपांची कल्पना विविध कलांच्या द्वारें प्रकट करणारा प्रेक्षणीय विभाग.
★ २४ एप्रिल हा दिवस स्त्रियांच्या करितां राखून ठेवला आहे.
★ प्रवेश द्वार " प्रभात "च्या कुशल कलावंतांनीं उभारलें आहे.

**व्यापारी व कारखानदार वर्गासाठीं**

★ वेळ थोडा व स्टॉल्स मोजके शिल्लक असल्यामुळें रिझर्वेशन-साठीं त्वरा करावी.
★ स्टॉल्सचे भाडेः—
एक बाजू खुली—रुपये १००।-।-
दोन बाजू खुल्या— रु. १५०।-।-
★ प्रदर्शन व कार्य वाहकांना खालील पत्त्यांवर समक्ष भेटावे-
( १ ) श्री. डी. व्ही. पोतदार, शनवार पेठ, पुणें.
( २ ) श्री. सी. टी. चितळे, प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, लक्ष्मी-रोड, पुणें
( ३ ) श्री. पी. के. करुर, एक्झिबिशन ऑफिस, पुणें.
( ४ ) श्री. आर. जी. पाटील, एक्झिबिशन ऑफिस, पुणें.

प्रवेश फी—प्रौढांना २ आणे
लहानास १ आणा.

**NATIONAL SAVINGS PROJECTS EXHIBITION**

---

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,१६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष.  श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. घों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

## सर्व प्रसिद्ध माल

ओगले यांचे प्रभाकर कंदील, स्टोव्ह्ज, एनॅमलच्या थाळया वगैरे भांडीं, स्टेनलेस स्टीलचीं एव्हरसिल्व्हर भांडीं.

केळकर बंधू,
बुधवार चौक, पुणें २

केळकर बंधू, (शाखा)
मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)

# विविध माहिती

**एलेफंटा लेणी : सहलीचें स्थान**—मुंबईजवळ असलेल्या प्रसिद्ध एलेफंटा लेण्यांचा सहलीचें रम्य स्थान म्हणून उपयोग करण्याचा सरकारचा विचार आहे. मुंबई प्रांताचे मुख्यप्रधान श्री. बाळासाहेब खेर ह्यांनीं त्या दृष्टीनें सदर बेटाची नुकतीच पहाणी केली. हौशी प्रवाशांच्या सोईसाठीं उपवनें, भाड्याच्या खोल्या, उपाहारगृहें, इत्यादि सोई करण्याचा सरकारचा बेत आहे.

**काश्मीरमध्यें कर्जतहकुबीचा वटहुकुम**—काश्मीरमधील शेतकरी, बोटवाले, मजूर आणि इतर कामगार ह्यांच्या विरुद्ध कोर्टांतून कर्ज वसूल करण्याचीं जीं कामें चालू असतील तीं दोन महिनेपर्यंत स्थगित करावीं असा वटहुकूम काश्मीर सरकारनें काढला आहे. संस्थानांतील कांहीं ऋणकोंना कर्जाच्या तगाद्या-पासून थोडी उसंत मिळावी म्हणून हा वटहुकूम जारी करण्यांत आला आहे.

**हिंदमधील पहिले टेलिफोन**—बंगलोर येथें स्थापन करण्यांत आलेल्या टेलिफोनच्या कारखान्यांत आतां टेलिफोन्स जुळविण्याचें काम चालू झालें आहे. कारखान्यांत तयार झालेले पहिले २५० टेलिफोन्स म्हैसूरला देण्यांत आले. टेलिफोन्सचे भाग जुळविण्याचें शिक्षण २० मुलींना देण्यांत आलें आहे. कारखान्यांत हल्ली आठवड्यांत २०० टेलिफोन्स जुळविण्यांत येतात. कारखाना पूर्णपणें चालू झाल्यावर दर आठवड्याला ५०० टेलिफोन्स तयार होतील. टेलिफोन्सला लागणारे सुटे भाग भरपूर आले असून पुढील वर्षी २५,००० टेलिफोन्स तयार होतील असा अंदाज आहे. कारखान्यांत फक्त स्त्रियांनाच कामावर घेण्यांत येणार आहे.

**रशिअन संशोधकांना बक्षिसें**—औद्योगिक, शास्त्रीय आणि इतर क्षेत्रांत संशोधन करणाऱ्या अगर विशेष कर्तृत्व दाखविणाऱ्या १,०४५ रशिअन नागरिकांना मिळून २,१७,२५,००० रूबल्स किंमतीचीं स्टॅलिन पारितोषकें नुकतींच वाटण्यांत आलीं. ह्या संशोधकांत मास्कोमध्यें गगनचुंबी इमारती बांधण्यासाठी नमुने तयार करणारे स्थापत्य शास्त्रज्ञही आहेत. मॉस्कोंत एक २६ मजली इमारत विद्यापीठासाठीं बांधण्यांत येणार आहे.

**मद्रासमधील धान्य वसुली**—मद्रास प्रांतांतील धान्य वसुलीच्या कामांत सुधारणा झाल्यामुळें प्रांतांतील तांदुळाचा सांठा ४,७५,००० टनापासून ४,९६,००० टनापर्यंत वाढला आहे. एप्रिल २ रोजीं संपलेल्या आठवड्यांत २०,१६७ टन तांदूळ वसूल करण्यांत आला. प्रांतांतील धान्य परिस्थिती अधिक सुधारण्यासाठीं मद्रास सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे तांबड्या जोंधळ्याची मागणी केली आहे.

**निर्वासित धंदेवाल्यांची परिषद**—हिंदुस्थानच्या फाळणीमुळें निर्वासित झालेल्या धंदेवाल्यांची एक परिषद ता. २४ एप्रिल रोजीं पूर्व पंजाबांत पानिपत येथें भरविण्यांत येणार आहे.

**सौराष्ट्र सरकारला कर्ज**—हिंद सरकारनें सौराष्ट्र सरकारला पुनर्घटनेला मदत म्हणून ८७ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्यांपैकीं २५ लाख रुपये रकम शहरांतील निराश्रितांची लहान उद्योगधंद्यांत आणि ग्रामोद्योगांत सोय लावण्यासाठी खर्च करण्यांत यावयाची आहे. उरलेली रकम घरें बांधण्यासाठी राखून ठेवलेली आहे. ह्या रकमेचा उपयोग करून ३,००० घरें आणि २,००० दुकानें बांधण्यांत येणार आहेत.

**कराचीमधील हातमाग बंद**—कराचींतील २,००० हातमाग सुताच्या भरमसाठ चढलेल्या किमतीमुळें बंद पडले आहेत असें समजतें. प्रत्येक हातमागावर रोज १६ वार कापड तयार होत असे. शिवाय, कापड रंगविण्याच्या साहित्याची वाण भासत आहे. त्यांतच परदेशांतून बरेंच कापड आल्यानें ह्या धंद्याला तूर्त तरी अवकळा प्राप्त झाली आहे.


**फळझाडांची लागवड**—मध्यभारत सरकारनें बरीच पडीक जमीन प्रथमच लागवडीस आणण्याची योजना आखली आहे. ह्या योजनेशिवाय आणखी दोन हजार बिघे जमीन शेतीखालीं आणण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या नवीन योजनेंत १,००० फळझाडें आणि जळणासाठी वापरण्यासारखीं झाडें लावण्याचा सरकारचा इरादा आहे. चालू वर्षींच हा कार्यक्रम अंमलांत आणला जाईल असें समजतें.

**कलकत्त्याच्या संस्थेला मदत**—१९४९-५० सालापासून हिंदुस्थान सरकारनें कलकत्ता येथील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट ह्या आंकडे शास्त्रीय संस्थेला वार्षिक ५ लाखांची मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेपैकी बरीच रकम आकडेशास्त्रीय संशोधनावर खर्च केली जाणार आहे.

**म्हैसूरला अन्नधान्याची जरूरी**—सध्या म्हैसूर संस्थानांत दर माणशीं दररोज ८ औंस शिधा दिला जातो. चालू वर्षांत हेंच शिध्याचें प्रमाण चालू ठेवावयाचें म्हटलें तरीसुद्धां म्हैसूरला मध्यवर्ती सरकारकडून २२ हजार टन धान्याची जरूरी लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. शक्य तर २२ हजार टन तांदूळच पुरवावा अशी मागणी म्हैसूर सरकारतर्फे करण्यांत आली आहे.

**सौराष्ट्रांतील गुरांसाठीं छावण्या**—सौराष्ट्रांतील दुष्काळी भागांतील गुरांचें पोषण करण्यासाठी सरकारनें आणखी १५ छावण्या उघडण्याचें ठरविलें असून छावण्यांच्या खर्चासाठी ३,४५,००० रुपयांची रकम मंजूर केली आहे.

**गुजरातमधील बँकांच्या नौकरांचा मध्यवर्ती संघ**—गुजरात आणि सौराष्ट्रांतील बँकांतून कामें करणाऱ्या नौकरांची आजपर्यंत मध्यवर्ती संघटना नव्हती. आतां त्यांनीं आपल्या संघाची एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ही मध्यवर्ती संस्था महात्मा गांधींच्या तत्त्वावर चालविण्यांत येणार आहे. मुंबई विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाचे अध्यक्ष श्री. शांतिलाल शहा ह्यांनीं वरील संस्थेचें उद्घाटन केलें.



# अर्थ

बुधवार, ता. २० एप्रिल १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## अमेरिकेंतील जीवनांत मोटारींचें स्थान

अमेरिका हा देश विस्तीर्ण असल्यानें त्यांतील शहरें आणि गांवें एकमेकांपासून दूरदूर वसलेलीं आहेत. त्यामुळें अमेरिकन नागरिकांना लांबचा प्रवास करावाच लागतो. त्या देशांतल्या १६ वर्षें वयाच्या नागरिकांपैकीं जवळ जवळ निम्म्या लोकांजवळ मोटार चालविण्याचे परवाने आहेत. ह्या नागरिकांनीं गेल्या वर्षांत ४०० महापद्म मैल प्रवास केला असावा असा अंदाज आहे. युरोपमध्यें कोठल्याही कारखान्याबाहेर जशा सायकलींच्या रांगा दिसतात त्याचप्रमाणें अमेरिकन कारखान्याबाहेर मोटारींच्या दिसत असतात. कित्येक अमेरिकन कामगारांना कामावर जाण्यासाठीं रोज ७० मैलांचा प्रवास करावा लागतो. शहरांतील आणि खेड्यांतील शाळांत जाण्यासाठी ५० लाख विद्यार्थी शाळांनीं ठेवलेल्या बसचा उपयोग करतात. शेतीच्या केंद्रांपासून बाजारापर्यंत वहातूकही फार मोठ्या प्रमाणावर चालते. उदाहरणार्थ, शहरांतील कत्तलखान्याकडे मांसासाठीं जीं गुरें पाठविलीं जातात त्यापैकीं निम्मी मोटार लॉरीनें नेलीं जातात. अमेरिकन ट्रकिंग असोसिएशन ह्या वाहतूक करणाऱ्या कंपनीचा वहातुकीच्या रोजच्या सरासरीचा निर्देशांक १९४८ सालीं २३० पर्यंत चढला; १९३८ ते १९४० सालच्या सरासरीचा तो १०० होता.

अमेरिकेंत ९० लाख लोक मोटारी तयार करणें, विकणें त्या चालू स्थितींत ठेवणें अगर चालविणें अशा व्यवसायांत गुंतलेले असतात. काम करून पैसे मिळविणाऱ्या प्रत्येक ७ माणसांत १ माणूस ह्या ना त्या प्रकारच्या मोटारविषयक धंद्यांत गुंतलेला आढळून येतो. मोटारींची जुळणी करणारे एकूण ११२ कारखाने अमेरिकेंत आहेत आणि ते ७७ शहरांतून आणि २४ संस्थानांतून पसरलेले आहेत. अमेरिकेंत उत्पन्न होणाऱ्या लोखंडापैकीं निम्मे लोखंड मोटारीचे कारखाने घेतात. त्याशिवाय एकूण उत्पादनापैकीं ३ काच तक्के, ३ कच्चें रबर, ६८ टक्के मढविण्याचीं कातडीं, २३ टक्के निकेल इत्यादी मालमसाला ह्या धंद्याला लागतो. मोटारींच्या एवढ्या उत्पादनास २५ लक्ष एकर जमिनींत निपजणाऱ्या मालापासून बनविलेले रंग, तेलें, सीट कुव्हर्स, इत्यादि लागतात. केवढी तरी मोठी शेती मोटारींच्या उत्पादनाशी निगडित आहे ! अमेरिकेंतील मोटारीच्या कारखान्यांनीं १९४८ सालीं ५२,६६,९२६ मोटारी तयार केल्या. ह्यांत ट्रक्स आणि बसेस ह्यांचाही समावेश करण्यांत आलेला आहे. त्या देशांत मोटारीचा धंदा निघाल्यापासून १० कोटी मोटार गाड्या तयार झालेल्या आहेत. आज ४ कोटी मोटारी वापरांत आहेत. अमेरिकेच्या लोकसंख्येशीं मोटारींचे प्रमाण दर चार माणसाला एक मोटार असें पडतें. ह्या वर्षी अमेरिकेंतील ५९ कंपन्या २१ प्रकारच्या खाजगी मोटारी, ३९ प्रकारच्या लॉरी आणि २० प्रकारच्या मोटार बसेस तयार करण्यांत गुंतलेल्या आहेत. खाजगी गाड्यांत शेवरोलेट कंपनीचा नंबर पाहिला लागतो. १९४८ सालीं ६,२०,३७४ शेवरोलेट गाड्या विकल्या गेल्या; त्याखालोखाल फोर्ड कंपनीनें ४,००,२८१ विकल्या आणि प्लायमाउथ गाड्या ३,९४,७७६ विकल्या गेल्या. अमेरिकेंत छोट्या खाजगी गाड्यांना कितपत वाव आहे तें नीटसें सांगतां येत नाहीं. १९४८ सालीं दर महिना १,५०० ब्रिटिश मोटारी अमेरिकेंत आयात होत असत; खुद्द अमेरिकेंत क्रॉस्ले कंपनीनें अशा २७,९८२ छोट्या गाड्या तयार केल्या. प्रत्येक गाडीची किंमत सुमारें १००० डॉलर्स ठेवण्यांत आलेली होती. शहरांच्या उपनगरांतून राहणाऱ्या अमेरिकन गृहिणींना ह्या गाड्यांचा फार उपयोग होतो. त्या आपल्या मुलांना आपल्या छोटेखानी मोटारींतून शाळेंत पोंचवितात आणि येतांना वाणसामान, बाजारहाट करून परततात. ह्या गाड्यांना पेट्रोलहि कमी लागतें. लांबच्या प्रवासाला मात्र त्यांचा उपयोग चांगला होत नाहीं.

महायुद्धापासून मोटारींतून अनावश्यक पण चैनीच्या सोयी करण्याची प्रथा पडली आणि मोटारी घेणाऱ्या ग्राहकांना अशा सोयी नको असल्या तरी घ्याव्या लागूं लागल्या; कारण मोटारींची मागणी भरमसाठ वाढलेली होती. तथापि आतां ही परिस्थिति बदलत चालली आहे. मोटारी तयार करणाऱ्या कारखान्यांत स्पर्धा चालू झाली आहे. गेल्या ७ वर्षांत जाहिराती आणि सौदे जमविणारे विक्रेते ह्यांवर होणारा खर्च मोटार कारखान्यांच्या अंदाजपत्रकांत अगदी बेताचा असे. १९४९ सालीं मात्र सर्व कंपन्यांनीं अशा मोठ्या खर्चाची व्यवस्था केली आहे. तथापि अमेरिकेंतील मोटारीची अंतर्गत बाजारपेठ एक वर्षभर तरी तेजींत राहील असें वाटतें. कारण, १९४७ सालीं चालू असलेल्या गाड्यांपैकीं ४२ टक्के गाड्या १० वर्षांच्या किंवा त्याहीपेक्षा अधिक जुन्या झालेल्या होत्या. गेल्या वर्षीपेक्षा १० टक्के अधिक उत्पादन करण्याचा अमेरिकन कारखान्यांचा बेत मात्र फारसा सफळ होईल असें वाटत नाहीं. कारण, शस्त्रास्त्रांचे कारखाने मोटारींच्या कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाची अधिक मागणी करूं लागले आहेत !

## प्राप्तीवरील कराची वसुली

ह्या वर्षाच्या आरंभीं प्राप्तीवरील कराच्या वसुलीची तपासणी करतांना असें आढळून आलें कीं ३,८५,००० इतक्या लोकांवर कराची आकारणी करण्याचें राहिलें होतें. ज्यांच्यांवर आकारणी झाली होती अशांकडून ३८ कोटी रुपयांचें येणें होतें. ह्या दोन्ही बाबतींत त्वरा करण्याची मोहीम अंगिकारल्यामुळें डिसेंबर १९४८ अखेर कर भरण्यास मात्र अशी १,९७,३८५ प्रकरणेंच शिल्लक राहिलीं, आणि कराच्या थकबाकीपैकीं १५ कोटी रुपये वसूल करण्यांत आले. कर भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तींनीं देश सोडला असेल, अगर तसें करण्याचा ज्यांचा मानस असेल, तर त्यांच्याकडून येणें असलेल्या कराची रक्कम बुडूं नये म्हणून फेब्रुआरी १९४८ मध्यें एक वटहुकूम काढण्यांत आला. ह्या हुकुमान्वयें शेतीची जमीन सोडून इतर मालमत्ता–विषयक खरेदीपत्रें, प्राप्तीवरील कर भरला असल्याबद्दलचा अधिकृत दाखला मिळविल्याशिवाय नोंदण्याची मनाई करण्यांत आली होती.

शंका समाधान

## बँकिंग कंपन्यांचा नवा कायदा

### दिखाऊ जिंदगी लिहून टाकल्यावरच डिव्हिडंड

बँकांनीं डिव्हिडंड वाटण्यापूर्वी केवळ कागदी असा सर्व दिखाऊ भांडवली खर्च लिहून टाकलेला असला पाहिजे, अशी १५ व्या कलमानें सक्ति केली आहे. कित्येक बँकांच्या जिंदगीच्या बाजूस प्राथमिक खर्च, ऑर्गनायझेशन खर्च, शेअरविक्रीसाठी दिलेलें कमिशन, ब्रोकरेज, पूर्वी झालेला तोटा, इत्यादि बाबी असतात. परंतु, "त्यांच्या किंमतीची ही जिंदगी," असें कोणत्याहि खरीदाराकडे बोट दाखवून सांगता येत नाहीं. हिशेबी वर्षाच्या नफ्यांतून डिव्हिडंड वाटता वाटता, जिंदगीचे बाजूकडील हे भांडवली खर्च हळूहळू कमी करण्याचें बँकांचें धोरण असतें. शक्य तितक्या लवकर, अशी केवळ दिखाऊ जिंदगी लिहून टाकणें इष्टच असतें. परंतु नव्या किंवा लहान बँकांना हें लवकर शक्य होत नाहीं. बँकिंग कंपन्यांच्या नव्या कायद्यानें ह्याबाबत जो नियम केला आहे, त्यामुळें आतां लवचीकपणास आजिबात वाव उरलेला नाहीं आणि हे भांडवली खर्च ताळेबंदांतून पूर्णपणें नाहींसे होईपर्यंत बँकांस डिव्हिडंड वाटता येणार नाहीं. ह्या खर्चाच्या तरतुदीचा नफ्यावर डिव्हिडंडचे आधी हक्क पोचेल. बँकेनें कितीहि मोठे रिझर्व्ह निर्माण केलेले असले, तरी जोपर्यंत ही दिखाऊ जिंदगी लिहून टाकण्यांत आलेली नाहीं, तोंवर डिव्हिडंड वाटता येणार नाहीं. ह्या बाबतींत १५ वें कलम अगदी स्पष्ट आहे.

### एकाच व्यक्तीचें अनेक बँकांचें संचालकत्व

एकाच व्यक्तीस दोन बँकांचे डायरेक्टर रहाता येणार नाहीं. त्यामुळें, कोणत्या बँकेचे आपण डायरेक्टर रहावयाचें, हें त्यानें ठरवून बाकीच्या बँकांच्या संचालकत्वाचा त्यानें राजीनामा दिला पाहिजे. ह्यामुळें, लहान बँकांना मोठ्या बँकांच्या डायरेक्टरांचा सल्ला मिळण्याची एक सोय नष्ट होत आहे. मोठ्या बँकेंत मिळणारी प्रतिष्ठा, फी, उपयुक्त कार्य करण्याचा मोठा वाव, इत्यादींचा विचार करून कित्येक डायरेक्टर लहान बँकांतून निघून जाण्याचा संभव आहे. आपुलकीनें जे रहातील, त्यांची गोष्ट वेगळी.

### व्यवस्थापकाचा पगार

कोणत्याहि बँकेचा व्यवस्थापक ह्यापुढें दुसऱ्या कंपनीचा (बँकिंग कंपनीची सबसीडिअरी कंपनी वगळून) डायरेक्टर राहूं शकणार नाहीं. त्यास दुसरा धंदा किंवा व्यवसायहि करण्यास परवानगी नाहीं. व्यवस्थापकाचा बँकेशीं असलेला करार पांच वर्षांपेक्षां दीर्घ काळाचा असणार नाहीं. त्यास मिळणारा पगार बँकिंगच्या व्यवसायांतील इतरांचे पगार लक्षांत घेता त्याच्या बँकेच्या खेळत्या भांडवलाशीं (रिसोर्सेस) विसंगत आहे असें दिसल्यास, रिझर्व्ह बँक जो निर्णय देईल तो अखेरचा समजला जाईल. म्हणजे, त्याचा पगार फारच कमी असेल, तर तो वाढवूनहि घेता येईल, असा ह्या १० व्या कलमाचा अर्थ होऊं शकतो. बँकेस नफा किती होतो, ह्याचेशीं व्यवस्थापकाच्या पगाराचा संबंध ठेवलेला नाहीं. त्याचप्रमाणें वसूल भांडवलाशीहि तो निगडित नाहीं.

---

**अहमदाबादचें ध्वनिक्षेपक केंद्र**—अहमदाबाद येथें नव्यान उघडण्यांत आलेल्या ध्वनिक्षेपक केंद्रानें ता. १६ एप्रिल पासून ३२६·१ मीटरवर आपले कार्यक्रम सुरू केले.

## हिंदमधील विजेचा प्रसार

(१९४७ सालाविषयक आकडे व माहिती)

**उत्पादन व खप:**—१९४७ सालीं हिंदमध्यें ४०० कोटी यूनिट विजेची निर्मिति झाली. १९३९ चे मानानें हा आकडा ६६·८% मोठा आहे; १९४६ चे मानानें तो ४·७% ज्यास्त आहे.

वर्षामध्यें एकूण ३३६ कोटी यूनिट विजेची विक्री झाली; त्यापैकीं कारखान्यांतून ६४% वीज खपली. उजेड, उष्णता व स्वैपाक ह्यासाठी १८% वीज वापरण्यांत आली. ८% वीज वहातुकीसाठी लागली. कारखान्यांपैकी लोखंड-पोलाद, ताग, सिमेंट, ह्या सर्वांनीं जेवढी वीज वापरली त्यापेक्षा एकट्या कापडाच्या गिरण्यांनींच ज्यास्त घेतली.

**खेडेगांवात वीज नाहीं:**—एक लक्षापेक्षा ज्यास्त वस्तीच्या सर्व ४९ शहरांना विजेचा पुरवठा आहे. परंतु, पांच हजाराखालील वस्तीच्या ५,५९,७४६ गांवांपैकी फक्त १,२९२ म्हणजे ०·२% गांवांना वीज मिळते. बाकीच्या गांवांचा तपशील सोबत दिला आहे.

| लोकसंख्या | एकूण गांवें | पैकी वीज असणारी गांवें | वीज असणाऱ्या गांवांचें एकूण गांवांशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| ५०,०००—१,००,००० | ८७ | ८६ | ९८·८५ |
| २०,०००— ५०,००० | २७७ | २३१ | ८३·३९ |
| १०,०००— २०,००० | ६०७ | २२५ | ३७·०७ |
| ५,०००— १०,००० | २,३६७ | २११ | ८.९१ |
| एकूण | ३,३३३ | ७५३ | ... |

**वीज कोणी व कशी उत्पादन केली:**— वीज निर्माण कोणी केली, हें पाहिलें तर एकूण उत्पादनाच्या ६३% वीज कंपन्यांच्या वीज गृहांत निर्माण झाली; ३६% वीज सरकारी मालकीच्या वीजगृहांत उत्पन्न झाली आणि फक्त १% वीज म्युनिसिपल वीजगृहांनीं तयार केली.

एकूण वीज पुरवठ्यापैकीं ९०·९२% वीज ए. सी. होती व फक्त ९·०८% वीज डी. सी. होती.

एकूण वीज गृहांपैकीं १६% वाफेवर चालली, ५·६% पाण्याच्या शक्तीवर (ठेवी) चालली आणि बाकीच्यांनीं तेल वापरलें. वीज निर्मितीसाठी १६,३२,००० टन कोळसा व ५३,००० टन तेल खर्ची पडलें.

**कलकत्ता व मुंबई:**— कलकत्ता व मुंबई ह्या दोन शहरांत एकूण हिंदी लोकसंख्येच्या निम्मे लोक रहातात परंतु त्या दोन शहरांत विजेच्या एकूण उत्पादनाच्या निम्मी वीज खपते. बाकीच्या ९९% लोकांच्या वाट्यास उरलेली ५०% वीज येते.

**योजना व अपेक्षा:**—सध्या वीज निर्मितीच्या ज्या योजना आखल्या अथवा चर्चिल्या जात आहेत, त्या पुऱ्या झाल्या तर विजेच्या बाबतींत हिंदुस्थानाचा जागतिक अनुक्रम रशिया व अमेरिका ह्यांच्या खालोखाल तिसरा येईल.

---

**इटली तांदूळ देण्यास तयार**—इटली हिंदुस्थानला ४०,००० टन तांदूळ देण्यास तयार असल्याचें समजतें. तांदुळाचा भाव दर टनामागे ४५ पौंड (सुमारें ६०० रुपये) आहे. तांदूळ जिनोआ येथें बोटीवर चढविण्यांत येईल. एकंदर तांदुळापैकीं १०,००० टन तांदुळच्या कण्या आहेत.

## कंपनी-कायदा व प्राप्ति-कर.
## न वाटलेल्या डिव्हिडंडवर कर आकारला !

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निर्णय

कंपन्यांना, विशेषतः प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांना महत्त्वाचा वाटेल असा एक निर्णय मुंबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश व न्यायमूर्ती तेंडोलकर ह्यांनीं नुक्ताच दिला आहे. सर कस्तुरचंद लिमिटेड ह्या खाजगी कंपनीच्या १९४१ ते १९४४ ह्या तीन वर्षांच्या प्राप्तीवरील कराची आकारणी करतांना प्राप्ति कर अधिकाऱ्यांना असें दिसून आलें कीं, कंपनीला नफा झालेला असूनहि कंपनीनें कांहींहि डिव्हिडंड वांटलेलें नाहीं. म्हणून त्यांनीं कर-आकारणी करून 'नफ्यापैकीं कांहीं रकम डिव्हिडंड म्हणून वांटली गेली असें समजण्यांत यावें,' असा हुकूम प्राप्ति-कर कायद्याच्या २३ (अ) ह्या कलमाखालीं काढला. तेव्हां कंपनीनें सदर प्रश्न हायकोर्टापर्यंत नेला.

प्राप्ति-कर कायद्याचे २३ (अ) हें कलम सामान्यतः खाजगी कंपन्यांचे बाबतींत लागू करण्याचा प्रसंग येतो. कंपनीला नफा होऊनहि डिव्हिडंडच्या रूपानें तो वांटला गेला नाहीं तर कंपनीच्या भागदारांच्या प्राप्तीमध्यें त्या नफ्याचा अंश समाविष्ट होऊं शकत नाहीं व त्यामुळें भागदारांच्या वैयक्तिक प्राप्तीवरील कराची आकारणी न्याय्य दरानें न होता हलक्या दरानें होते. ह्यासाठी मोजक्या भागदारांच्या खाजगी कंपन्या इष्ट तेव्हां डिव्हिडंड जाहीर न करतां आपला नफा राखून ठेवण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळीं कंपनीनें साठ टक्क्यांपेक्षां कमी उत्पन्न डिव्हिडंडच्या रूपानें वांटलेलें दिसून आलें व कंपनीची एकंदर परिस्थिती जर चांगली असेल तर प्राप्ति-कर अधिकाऱ्यांना वरील कलमाखालीं 'कंपनीनें न वांटलेल्या नफ्यापैकीं योग्य ती रक्कम डिव्हिडंड म्हणून वांटली गेली असें समजण्यांत यावें' असा हुकूम काढता येतो.

वरील प्रकरण हायकोर्टांत गेल्यावर कंपनीतर्फें असा युक्तिवाद मांडण्यांत आला कीं २३ (अ) हें कलम कंपनीनें देऊं केलेलें डिव्हिडंड जेव्हां अपुरें व अल्प असेल तेव्हां लागू करता येते. कंपनीनें अजिबात कांहींच डिव्हिडंड जर जाहीर केलेलें नसेल तर ह्या कलमाचा उपयोग करता येणार नाहीं. परंतु हायकोर्टानें कंपनीचें हें म्हणणें मान्य केलें नाहीं. कंपनी डिव्हिडंड जाहीर न करो वा अल्प डिव्हिडंड जाहीर करो, दोन्ही प्रसंगीं प्राप्तिकर अधिकाऱ्यांना २३ (अ) कलमाखालीं हुकूम काढता येईल असें हायकोर्टानें मत दिलें. दुसरी गोष्ट २३ (अ) कलमाखालीं हुकूम करण्यापूर्वीं अधिकाऱ्यांनीं पूर्वीच्या वर्षांत कंपनीला तोटा झालेला असेल तर तो तोटा आणि कंपनीला झालेला नफा फारच थोडा असेल तर त्या नफ्याचें अल्प प्रमाण ह्या दोन गोष्टी लक्षांत घ्याव्यांत असें मूळ कलमांत आहे. त्या बाबत कंपनीचें म्हणणें असें होतें कीं वरील गोष्टींबरोबरच, कंपनीचें भरणा झालेलें भांडवल किती आहे ? वगैरे अन्य गोष्टींचाहि विचार अधिकाऱ्यांनीं ह्या कलमाखालीं हुकूम करण्यापूर्वीं करावा. परंतु हायकोर्टानें कंपनीचें हेंहि म्हणणें मान्य केलें नाहीं. सारांश, अशा प्रकारचा हुकूम काढावयाची संधीच अधिकाऱ्यांना न देणें कंपन्यांच्या दृष्टीनें योग्य ठरतें.


सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[ स्थापना १९१८ ]



सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ रे. नं. ३११६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,२०,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,५६,००० |
| ठेवी | ... | रु. ८५,२८,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९३,१५,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

सब-ऑफिस : —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

वा. पुं. वर्दे, बी. कॉम्. अध्यक्ष.
प. ज. देशपांडे, बी. कॉम्., सेक्रेटरी.

पाडव्याच्या सुमुहूर्तावर बँकेची शाखा मार्केट बेळगांव येथें श्री. शं. वि. संझगिरी बी. कॉम्., सेक्रेटरी यांच्या देखरेखीखालीं सुरू झाली आहे.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

—शेड्यूल्ड बँक—

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल.... ... .... | रु ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. २२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल .... .... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड.... .... .... | रु. ४,२०,००० |
| एकूण खेळतें भांडवल .... ... | रु. २ कोटीचे वर |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स.

श्री. धों. कृ. साठे (चेअरमन),
श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी
श्री. मा. वि. शहा
श्री. मा. म. गुप्ते

श्री. श्री. गो. भराठे (व्हाईस चेअरमन)
श्री. फ. दो. पदमजी
श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. मो. रा. ढमढेरे

गेल्या वर्षासाठीं बँकेनें ५ टक्के करमाफ डिव्हिडंड जाहीर केलें.

सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २.

सी. व्ही. जोग, मॅनेजर.

(पॅरेमाउंट लि.)

## हिंद व जागतिक गव्हाचा करार

( मा. म. का. )

आंतरराष्ट्रीय गव्हाच्या जागतिक करारावर हिंदनें सही केली असून हा करार पांच वर्षे बंधनकारक आहे. ह्या करारान्वयें गव्हाची किंमत दर वर्षी बुशेलमागें दहा सेंट या प्रमाणांत कमी होत जाणार आहे, व दरवर्षी हिंदला १० लक्ष टन गहूं खरेदी करतां येईल. इंग्लंडला गव्हाची आयात फार मोठ्या प्रमाणांत करावी लागत असल्यामुळें इंग्लंडच्या दृष्टीनें हा करार केव्हांहि फायदेशीर आहे. कारण, गेल्या वर्षी इंग्लंडनें कॅनडा व ऑस्ट्रेलिया ह्या देशांना बुशेलमागें अनुक्रमें २·४ व २·७ डॉलर किंमत दिली त्या मानानें आतां द्यावी लागणारी चालू वर्षाची किंमत १·८ डॉलर ही पुष्कळच कमी आहे व ती दर वर्षी आणखी १० सेंटसनीं कमी होत जाणार. गव्हाचे बाबतींत उत्पादन आतां निश्चित दरवर्षी वाढत चाललें आह व त्या मानानें गहूं खरेदी करणाऱ्या देशांना कांहींशी अनुकूल परिस्थिति निर्माण होत आहे. अर्जेंटिना व सोव्हिएट राशिया हे दोन देश गहूं करारांत सामील नाहींत. ह्या दोन देशांकडून गव्हाची विक्री १९४८ सालीं १२ कोटी बुशेल झाली. इतर देशांकडून गव्हाचा पुरवठा होऊं शकला नाहीं किंवा त्यांचा भाव खरेदीदार देशांना परवडला नाहीं तर हे दोन देश कमी भावांत गहूं पुरविणें शक्य आहे व ही गोष्ट खरेदी करणाऱ्या देशांच्या पथ्यावरच पडेल.

हिंदच्या दृष्टीनें विचार करतां महायुद्धापूर्वी हिंदुस्थानांत गव्हाची आयात विशेष होतच नसे. फाळणीनंतर व हल्ली निर्माण झालेल्या बिकट अन्नपरिस्थितीमुळें गव्हाची आयात करावी लागते. परंतु युद्धकाळांत तांदुळाचें ब्रह्मदेशांतील व इतर देशांतील उत्पन्न बरेंच कमी झाल्यामुळें व अजूनहि तें पूर्व स्थितीला न आल्यामुळें हिंदला इच्छा असूनहि हवा तेवढा तांदूळ खरेदी करतां येत नाहीं. अशी आजची स्थिति आहे. लौकरच तांदूळ उत्पादन करणाऱ्या देशांतील उत्पादनाची परिस्थिति सुधारेल व मग हिंदला गव्हाचे ऐवजीं तांदूळच खरेदी करणें जास्त सोइस्कर पडेल. कारण एक तर तांदूळ हेंच हिंदमधील पुष्कळशा लोकांचें मुख्य अन्न आहे व दुसरी गोष्ट म्हणजे तांदळाचा बाजारभाव जागतिक गहूं करारान्वयें ठरलेल्या गव्हाचा बाजारभावाहूनहि कमी असूं शकेल. असें होणें दूरच्या परिस्थितीच्या दृष्टीनें संभवनीय असलें तरी पुढील एक-दोन वर्षांचा विचार करतां गहूं-करार हिंदला तात्पुरता फायदेशीर ठरणार आहे. कारण त्यामुळें गव्हाच्या आयातीवरचा खर्च २८ कोटी रुपयांनीं पुढील वर्षी कमी होईल, व ही गोष्ट हिंदच्या अन्नपरिस्थितीच्या दृष्टीनें समाधानकारक आहे.

परंतु दीर्घकालीन परिस्थितीच्या दृष्टीनें विचार करतां गव्हाच्या अर्जेंटिन, राशिया इ. देशांतील किंमती उतरूं लागल्यास त्याचा फायदा हिंदला मिळणार नाहीं. आशिया खंडांतील तांदुळाचें उत्पादन वाढून तांदूळ स्वस्त झाल्यास त्यापासूनहि हिंदला फायदा होणार नाहीं. कारण, गहूं-खरेदी करण्याचा निर्बंध असल्यामुळें स्वस्त दराचा तांदूळहि खरेदी करणें अशक्य होईल. विचाराची आणखी एक बाजू अशी कीं १९५२ सालीं धान्याचें बाबतींत हिंदनें स्वयंपूर्ण बनलें पाहिजे असा सरकारी कार्यक्रम ठरविण्यांत आला आहे. हा कार्यक्रम यशस्वी झाल्यास दहा लक्ष टन गहूं करारान्वयें खरेदी करणें हिंदला महाग पडेल. कदाचित् अडचणीच्या प्रसंगीं शिल्लक म्हणून इतक्या गव्हाची आयात हिंदनें केली असें मानलें तरी तेंहि आर्थिकदृष्ट्या परवडणें कठीण आहे.

### मालक-कामगार यांच्यांचे निवाडे

" मुंबईमधील गिरणी कामगारांना १९४६ चे मानानें १९४८ सालीं दरमहा २६ रु. ज्यास्त मिळाले. म्हणजे, गिरण्यांना १९४८ सालीं ६३ कोटी रुपये ज्यास्त मजुरी द्यावी लागली. परंतु त्याचा कांहीं उपयोग झालेला नाहीं. गिरण्यांतून बेशिस्तपणा वाढला आहे. कामाबद्दल कामगारांची अनास्था आहे. त्यांचें उत्पादन पूर्वीपेक्षा निश्चितपणें कमी आहे. सक्तीच्या आर्बिट्रेशनमुळें मालक व कामगार ह्यांचेमध्यें देवाण-घेवाण होण्यास कोणतेंच आकर्षण उरलेलें नाहीं. इनकमटॅक्स खातें, कामगार आणि वकील ह्यांच्याच फायद्यासाठी गिरण्या चालवाव्या लागत आहेत ! कामगारांना योग्य वाटा मिळण्यास माझा कधीच विरोध नाहीं. माझ्या कामगारांचें व माझें एकमत झालें नाहीं, तर कोर्टामार्फत निवाडा करण्यास मी तयार आहे. पण, कोर्टानें सारासार समतोल विचार करून, योग्य गोष्टींस महत्त्व देऊन आणि चालू कायद्याच्या कक्षेंत राहूनच निवाडा केला पाहिजे. परोपकार बुद्धि किंवा तत्वज्ञान त्यांत आणता कामा नये. इतर देशांतील विचारसरणी व कायदे किंवा समाजविषयक कल्पना ह्याहि येथें अप्रस्तुत आहेत." :— गिरणी मालक संघ, मुंबई, चे अध्यक्ष सर विठ्ठल चंदावरकर.

---

### सिंधिया कंपनीच्या मॅनेजिंग एजंटांचा राजीनामा !

सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. चे मॅनेजिंग एजंटस, मेसर्स नरोत्तम मोरारजी आणि कं., ह्यांनीं " आम्हांस ३० जून, १९४९ नंतर कंपनीचे मॅनेजिंग एजंट रहावयाचें नाहीं; ३० जून नंतरच्या व्यवस्थेची डायरेक्टरांनीं योग्य ती व्यवस्था करावी " असें सिंधिया कंपनीच्या डायरेक्टरांना त्यांच्या सभेंत कळविलें आहे. लेखी राजीनामा आल्यावर, नवे मॅनेजिंग एजंट नेमून, किंवा मॅनेजिंग डायरेक्टर नेमून, डायरेक्टरांना कारभार चालवावा लागेल. नरोत्तम मोरारजी कं. आज तीस वर्षे सिंधियाची मॅनेजिंग एजंट आहे.

---

### सक्करच्या धरणाची दुरुस्ती

सक्करचें धरण बांधलें, तेव्हां तें ५०० वर्षे सहज टिकेल, अशी अपेक्षा होती. त्यांची सध्याची नादुरुस्ती दुरुस्त करण्यास २० कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे. " वाळूच्या पायावर धरण बांधण्याचें तज्ज्ञांनीं साहस कसें केलें ?" असा प्रश्न परदेशी इंजिनिअर विचारीत आहेत, असें म्हणतात.

---

**हिंदमधील संप कमी झाले**—१९४८ सालचा आढावा घेतांना असें दिसून आलें आहे कीं १९४७ सालाच्या मानानें गेल्या वर्षी संप आणि औद्योगिक तंटे ह्यांच्या संख्येंत घट झाली आहे. त्यामुळें उत्पादन चालू असलेले दिवसही अर्थात वाढले आहेत आणि उत्पादन युद्धपूर्व कालापेक्षा १५ टक्क्यांनीं वाढलें आहेत. १९४८ सालीं संप व टाळेबंदी ह्यांची संख्या १६८४ भरली. त्याच्या मागील साली ही संख्या १८११ होती. वायां गेलेल्या दिवसांची बेरीज १,६५,६२,६६६ वरून ८०,३७,५३२ दिवसापर्यंत खाली आली. उत्पादनांत खीळ न पाडण्याची ही वृत्ति अशीच चालू राहिल्यास १९४९ मध्यें उत्पादन आणखी वाढेल असा भरवंसा वाटत आहे.

**तेलाच्या शुद्धीकरणाचा कारखाना**—हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर, विझगापट्टम येथें तेलाचें शुद्धीकरण करणाऱ्या कारखान्याची जागा असावी, असें आतां सरकारच्या भूस्तरखात्यानें मुक्रर केलें आहे.

[ हा प्रॉस्पेक्टस नव्हे, शेअर-विक्रीची जाहिरात आहे. ]

( भांडवल उभारणीस हिंदुस्थान सरकारची जरूर ती परवानगी मिळाली आहे, तथापि हिंदुस्थान सरकार या परवानगीअन्वयें कोणत्याहि योजनेची आर्थिक परिस्थिति समाधानकारक असल्याची अगर तत्संबंधीं केलेलें कोणतेंहि निवेदन किंवा मतप्रदर्शन बरोबर असल्याची जबाबदारी घेत नाहीं. )

# साठे बिस्किट अँण्ड चॉकोलेट कं., लि.

८२० भवानी पेठ, पुणें २.

## मॅनेजिंग एजंटस् : साठे फूड इण्डस्ट्रीज लि.

### उद्देश

कंपनीच्या अुद्देश पत्रकांत नमूद केल्याप्रमाणें व मुख्यतः बिस्किटें, कोको, चॉकोलेट व तत्सम अितर पदार्थ तयार करणें व विकणें.

वरील अुद्देश साध्य करण्यासाठीं कंपनीनें श्री. ग. रा. साठे यांच्या मालकीचे साठे बिस्किट कंपनी व साठे चॉकोलेट वर्क्स हे दोन चालू कारखाने, त्यांतील सर्व सामान, मशिनरी, ट्रेड मार्क्स, गुडविल, सर्व प्रकारचे चालू करार व श्री. साठे यांनीं परदेशांतून मागविलेली नवी अद्ययावत मशिनरी, तसेंच धानोरि (येरवडा) येथील कारखाना बांधण्यासाठीं घेतलेली नवी जागा यांसह घेण्याचा करार केला आहे. यामुळें सुरवातीस कंपनीच्या हातीं दोन चालू कारखाने येणार आहेत. त्याचप्रमाणें श्री. ग. रा. साठे यांच्या गेल्या २५ वर्षांच्या धंद्यांतील अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा कंपनीस मिळणार आहे - श्री. ग. रा. साठे यांचे बंधु श्री. द. रा. साठे व श्री. रा. रा. साठे, अेम्. अेस्सी. या दोन तज्ज्ञांचाहि कंपनीस लाभ मिळणार आहे. कारखान्याचा नांवलौकिक जरी गेल्या २८ वर्षांचा असला व चालू धंद्याचा फायदा जरी कंपनीस मिळणार असला तरी गुडविलबद्दल रु. १०,००० अितकी थोडी व नाममात्र रक्कम श्री. ग. रा. साठे यांना देण्याचा कंपनीनें करार केला आहे

धंद्याचें भवितव्य (प्रॉस्पेक्ट्स)— बिस्किटें, कोको व चॉकोलेट यांना वाढती मागणी आहे. राहणीचें मान वाढत जाअील त्या प्रमाणांत मागणी वाढतच जाणार आहे. साठे बिस्किट फॅक्टरी सुरवातीपासून आतांपर्यंत फायदेशीर रीतीनें चालू असून अुत्तरोत्तर फायदा वाढत आहे नवी अद्ययावत यंत्र सामुग्री बसविल्यानंतर अुत्पादन पुष्कळच वाढेल व त्याचबरोबर फायद्यांतही साहजिकच वाढ होत जाअील. चॉकोलेटच्या धंद्यांत सुरवातीपासून फायदाच होता. फक्त गेल्या वर्षी (१९४८) हिंदुस्तानच्या फाळणीमुळें बाजारपेठा गेल्यानें व कच्च्या मालाच्या भावांत अवास्तव वाढ झाल्यामुळें नुकसान आलें आहे; तथापि चॉकोलेट मिठाअीचें अुत्पादन सुरू झाल्यावर हें नुकसान भरून निघेल अशी अपेक्षा आहे. या धंद्यास लागणारी व मागविलेली नवी यंत्रसामुग्री बसवण्यास सुरवात झाली आहे. या धंद्यास संरक्षण देण्याचें तत्त्व हिंदुस्थान सरकारनें मान्य केलें असल्यानें सरकारी मदत मिळण्याचीहि खात्री वाटते.

**अधिकृत भांडवल : रु. ५०,००,०००**

**विक्रीस काढलेलें भांडवल : रु. २०,००,०००**

(१) प्रत्येकीं १०० रुपयांच्या ५०००, ५ (पांच) टक्के रिडीमेबल क्युमिलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, व

(२) प्रत्येकीं रु. १०० च्या १५,०००, ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें.

डायरेक्टर्स व त्यांचे संबंधीं यांनीं २८० ऑर्डिनरी शेअर्स घेतलेले आहेत· तसेंच श्री. ग. रा. साठे, मालक "साठे बिस्किट कंपनी" व "साठे चॉकोलेट वर्क्स", पुणें २ यांना त्यांचे कारखाने विकत घेण्याच्या कंपनीनें केलेल्या कराराप्रमाणें किंमतीच्या मोबदल्यांत पूर्ण भरणा झालेले (Fully Paid-Up) ऑर्डिनरी शेअर्स घेअून अुरलेले शेअर्स विक्री करितां आहेत.

### — डायरेक्टर्स —

(१) श्री. जी. व्ही. पुराणिक, (चेअरमन) पनवेल (जि. कुलाबा) डायरेक्टर : धूतपापेश्वर अिंडस्ट्रीज लि. मुंबअी, दि न्यू सिटिझन बँक ऑफ अिंडिया लि, मुंबअी. अि.

(२) श्री. डी. एस्. भावे, (व्हा. चेअरमन) व्यापारी, ... ... ८९२ सदाशिव पेठ. पुणें २. डायरेक्टर : दि वेस्टर्न अिंडिया हॉटेल्स् लिमिटेड, पुणें; नान्ज ग्लासवर्क्स लि, मुंबअी; कर्णिक ॲन्ड भावे लि., मुंबअी.

(३) श्री. पी. डी. गणपुले, सयाजी गंज, बडोदा. डायरेक्टर : परशुराम पॉटरी वर्क्स लि., मोरवी; जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. भिवंडी, (ठाणें); अि.

(४) रा. ब. जी जी. ॲबेकर, व्यापारी व जमीनदार, बारामती. डायरेक्टर : किर्लोस्कर ब्रदर्स, लि., किर्लोस्करवाडी; ओगले ग्लास वर्क्स लि, ओगलेवाडी; स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., पुणें; नान्ज ग्लास वर्क्स लि., मुंबअी अि.

(५) श्री. के. जी. कर्णिक, व्यापारी, १२१७ फर्ग्युसन रोड, पुणें २. डायरेक्टर : नान्ज ग्लास वर्क्स लि., मुंबअी. अि.

(६) श्री. जी. आर. साठे, (अेक्स-ऑफिशिओ.) ... ... ८२० भवानी पेठ, पुणें २. चेअरमन : दि प्रेसिडेन्सी अिंडस्ट्रिअल बँक लि, पुणें, दि महाराष्ट्र अिंजिनिअरिंग वर्क्स लि, पुणें, वेस्टर्न अिंडिया हॉटेल्स लि, पुणें. डे. चेअरमन कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि. पुणें. डायरेक्टर—लक्ष्मी टेक्स्टाअिल मिल्स लि, भोर. अुद्योगपूर वसाहत मंडळ लि., पुणें. नान्ज ग्लास वर्क्स लि. मुंबअी. साठे फूड अिंडस्ट्रीज लि. पुणें.

(७) श्री. डी. आर. साठे, (अेक्स ऑफिशिओ,) व्यापारी, ... ... ६८९ सदाशिव पेठ, पुणें २. डायरेक्टर : साठे फूड अिंडस्ट्रीज लि. पुणें.

### बँकर्स :

(१) दि प्रेसिडेन्सी अिण्डस्ट्रिअल बँक लि., पुणें व शाखा (२) दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें व शाखा (३) दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मुंबअी व शाखा (४) दि अिण्डियन ओव्हरसीज बँक लि., मद्रास व शाखा

### ऑडिटर्स :

मेसर्स जी. एम. ओक आणि कंपनी, रजिस्टर्ड अकोंटंटस् व ऑडिटर्स, १८० बुधवार पेठ, पुणें २.

### रजिस्टर्ड ऑफिस :

८२० भवानी पेठ, पुणें २.

श्री. साठे यांच्या दोन्ही कारखान्यांचीं नांवें हिंदुस्थान सरकारच्या संरक्षण ज्यांस पुरवठा करणाऱ्यांच्या यादीवर आहेत.

**नफा**— पहिल्याच वर्षी गोळा झालेल्या भांडवलावर शेंकडा ६ नफा देतां येअील असा भरंवसा वाटतो

**कामाची सुरवात**—कमींत कमी रु. २,००,००० दर्शनी किंमतीच्या शेअर्सची मागणी आल्यानंतर कंपनीच्या कामास सुरवात होअील.

**कमिशन** — शेअर विक्रीवरील कमिशन शेंकडा ५. पेक्षां जास्त रहाणार नाहीं.

**प्राथमिक खर्च**—शेअरविक्रीवरील कमिशन सोडून प्राथमिक खर्च अंदाजें रु. १५,०००/– येअील.

**व्यवस्था**:—कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाच्या देखरेखीखालीं कंपनीची सर्वसाधारण व्यवस्था कंपनीचे मॅनेजिंग अेजंटस् साठे फूड अिंडस्ट्रीज लि. पुणें, या कंपनीकडे राहील.

**डायरेक्टरांचे हितसंबंध** (Interest of Directors), श्री ग. रा. साठे यांचा हितसंबंध त्यांच्याशीं कंपनीनें केलेल्या खरेदी कराराबाबत नफ्यापैकीं जमीन व अिमारती यांच्या पुस्तकी किंमती (Book Value) वर चालू बाजारभावानें मिळणारा रु. १, ११, ८३० फायदा व कंपनीच्या अुभारणीसाठीं केलेला खर्च याबाबत आहे. तसेंच श्री. ग. रा. साठे व श्री. द. रा. साठे यांचा हितसंबंध त्यांना कंपनीचे डायरेक्टर म्हणून व तज्ज्ञ म्हणून मिळणाऱ्या वेतनाव्यतिरिक्त, कंपनीचे मॅनेजिंग अेजन्टस् मेसर्स साठे फूड अिंडस्ट्रीज, लि., यांना मिळणाऱ्या वेतनांत त्या कंपनीचे डायरेक्टर्स व शेअरहोल्डर्स म्हणून आहे.

शेअर अर्जाचे नमुने कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमधून व कंपनीचे सर्व बँकर्स व त्यांच्या शाखा यांच्या ऑफिसांतून विनंतीनुसार मिळतील.

### इंडस्ट्रिअल बँक लि., सांगली

( वार्षिक सभा: ८ मे, १९४९ )

१९४८ च्या फेब्रुवारीमधील दंगलीमुळें वरील बँकेची जाळ-पोळीमुळें सर्वस्वी हानि होऊन तिचें रेकॉर्डहि नष्ट झालें होतें. श्री. का. गो. शिराळकर, बी. एससी., बी. टी., ह्या डायरेक्टरांनीं ह्या कठीण प्रसंगीं उत्कृष्ट कामगिरी बजावून पुनर्घटनेचे कामीं सहाय्य केलें, त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेक डायरेक्टरांनीं आपल्या रिपोर्टांत केला आहे. १९४८ सालीं बँकेचे चालक आगीमुळें झालेलें २१ हजारांचें नुकसान १० हजारांवर आणून ठेवूं शकले व १९४७ चा ३८३ रुपयांचा तोटाहि लिहून टाकूं शकले, ही अभिनंदनाची बाब आहे. १२३ रु. घसारा काढून, प्राथमिक खर्चापैकीं ३०० रुपये कमी करण्यांत आले आहेत. बँकेचें वसूल भांडवल १,३७,७५० रु. असून ताळेबंद ४,५२,१८९ रुपयांचा आहे. अहवालाचे वर्षीं सर्व प्रकारच्या ठेवींत वाढ झालेली आहे. प्रो. पी. एम. लिमये, ( आर्थिक सल्लागार ) हे सांगली सरकारतर्फे बोर्डावर चेअरमन असून श्री. म. आ. कुलकर्णी बी. ए., एलएल. बी. हे सेक्रेटरी आहेत.

---

### टाटा पॉवरचीं डिबेंचर्स

टाटा पॉवर कंपनीनें ४% व्याजाचीं नवीं डिबेंचर्स काढलीं, त्यांची परतफेड १९७९ मध्यें होईल. हीं डिबेंचर्स विमा कंपन्यांनीं व परदेशी भांडवलदारांनीं खासगी रीतीनें घेतलीं, असें समजतें.

### श्री. ग. वि. पुराणिकांची निवृत्ति

श्री. ग. वि. पुराणिक हे दोन बँकांचे डायरेक्टर होते. त्यांपैकीं पनवेलच्या बांथिया बँकेचे डायरेक्टर ते राहिले असून न्यू सिटिझन बँकेंतून ते निवृत्त झाले आहेत, असें समजतें. नव्या कायद्याप्रमाणें कोणासहि दोन बँकांचे डायरेक्टर रहातां येत नाहीं.

### लॉर्ड बॉइड ऑर ह्यांचा सल्ला

हिंदुस्थानांतील अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्याचे कामीं हिंद सरकारास सल्ला देण्याकरितां लॉर्ड जॉन बॉइड ऑर ( संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न–शेती संघटनेचे माजी प्रमुख ) हे सरकारच्या निमंत्रणावरून येथें दाखल झाले आहेत. तूर्त तीन आठवडे ते हिंदुस्थानांत रहातील व जरूर तर पुनः येतील. त्यांचेबरोबर त्यांच्या पत्नीहि आल्या आहेत.

### दिल्ली येथें वेस्टर्न इंडियाची स्वतःची इमारत

"विमेदारांच्या संरक्षणासाठी ज्या गोष्टी कायद्यानें घडवून आणणें सरकारास जरूर झालें, त्यांपैकीं कित्येक गोष्टी वेस्टर्न इंडिया विमा कंपनी केव्हांपासूनच करीत आहे. तिला मॅनेजिंग एजंटस् कधींच नव्हते तिच्या पैशाची गुंतवण मुख्यतः सरकारी रोख्यांत आहे. त्याचा अर्थ, ज्यांच्या हातीं कंपनीचीं सूत्रें आहेत, ते कंपनीच्या म्हणजेच विमेदारांच्या पैशाचा उपयोग सोडतीसाठी किंवा स्वतःचे हितसंबंध असलेल्या दुसऱ्या कंपन्यांत गुंतविण्या-साठीं करीत नाहींत":—सर श्रीराम ह्यांचें, वेस्टर्न इंडिया हाऊस, दिल्लीच्या उद्घाटन प्रसंगीं भाषण.

राष्ट्रीय बचत योजनेतर्फे

### उद्बोधक प्रदर्शन

अल्प बचत योजनेनुसार पुणें येथें भरविण्यांत आलेल्या मोठ्या प्रदर्शनाचें उद्घाटन सोमवार, ता. १८ रोजीं मुंबई प्रांताचे अर्थ-मंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें झालें. २ मे अखेर हें प्रदर्शन दररोज सायंकाळीं ४ ते रात्रीं १० पर्यंत उघडें रहाणार आहे व त्यानंतरहि प्रदर्शनाची मुदत वाढवावी लागेल, असें त्याच्या उत्साहपूर्वक स्वागतावरून दिसून येत आहे. स्थानिक व पर प्रांतांतीलहि अनेक कारखानदार–व्यापाऱ्यांनीं प्रदर्शनांत आपला माल ठेवला असून सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांनींहि आपले स्टॉल्स उघडले आहेत. छोट्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळावें, या उद्देशानें कमी भाड्याच्या खास स्टॉल्सची योजना करण्यांत आली आहे.

---

### दि युनायटेड कमार्शिअल बँक लि.

वरील बँकेचें खेळतें भांडवल १९४५ अखेर ३०½ कोटी रु. होतें, तें दरसाल वाढत जाऊन आतां ५१ कोटी, ८४ लक्ष रु. झालें आहे. गेल्या एकाच वर्षांत खेळत्या भांडवलांत ४½ कोटींची भर पडली. सरकारी रोख्यांच्या किंमतींत सुमारें २% उतार झाला, ह्या दृष्टीनें नफ्यांतून ३० लक्ष रु. इनव्हेस्टमेंट खात्याकडे वर्ग करण्यांत आले व त्याचा गुप्त रिझर्व्ह निर्माण करण्यांत आला. बँकेनें ऑडिटसाठी ६०,६०० रु. खर्च केले. निवळ नफा ३६½ लक्ष रु. झाला. भागीदारांस ३% करमाफ डिव्हिडंड देण्यास ६ लक्ष रुपये लागले.

---

प्राप्तीवरील कराविरुद्ध तक्रार—सौराष्ट्र सरकारनें नुकतेंच प्राप्तीवरील कर बसविण्याचें जाहीर केलें होतें. सरकारच्या धोरणा-विरुद्ध राजकोटमधील २७ व्यापारी संस्थांनीं आपला निषेध सरकारला सादर केला आहे.


धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.

कोपरगांव, जि. अहमदनगर.

( उद्घाटन समारंभ : तां. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.

स्थानिक सहकारी बँक

सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षे-पर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.

जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन



तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

## कापडाच्या व सुताच्या उत्पादनांत घट

### ( १९४७–४८ )

हिंद सरकारच्या व्यापारी माहिती आणि आंकडे गोळा करणाऱ्या खात्यातर्फे १९४७–४८ सालांतील कापडाच्या व सुताच्या उत्पादनाचे आकडे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. त्यामागील वर्षाच्या मानानें सुताचें उत्पादन ८३ लाख पौंडांनीं आणि कापडाचें उत्पादन ११ कोटी वारांपेक्षां थोडें अधिक घटल्याचें दिसून येतें. खालील तक्त्यांत कापडाच्या उत्पादनाचे तौलनिक आकडे दिले आहेत.

कापडाचें उत्पादन

( आकडे लक्ष वारांचे )

| | १९३८–३९ | १९४६–४७ | १९४७–४८ |
|---|---|---|---|
| मुंबई | १७८३० | २४०८८ | २३४९९ |
| सं. प्रांत | २३८८ | २८३६ | २६१० |
| मद्रास | ७८५ | ९७२ | ९४९ |
| प. बंगाल | २०६२ | १७६५ | १५७६ |
| अजमीर-मारवाड | २९० | ३०५ | २८० |
| पूर्व पंजाब | ५६४ | ७२९ | २८५ |
| दिल्ली | ९४५ | ७७९ | ७०४ |
| मध्यप्रांत | ९१५ | ८१० | ८८९ |
| बिहार | २२ | ६० | ७० |
| संस्थानें | ६०६२ | ६५५४ | ६८३८ |
| एकूण | ४२६९३ | ३८८९८ | ३७७०० |

सुताचें उत्पादन

( आकडे लक्ष पौंडांचे )

| | १९३८–३९ | १९४६–४७ | १९४७–४८ |
|---|---|---|---|
| मुंबई | ६४७७ | ६६०६ | ६६८८ |
| मद्रास | १६८८ | १७५४ | १७१७ |
| प. बंगाल | ४५७ | ५०१ | ४४९ |
| सं. प्रांत | ११७७ | ११६६ | ११३७ |
| अजमीर-मारवाड | १५१ | १५३ | १३१ |
| पूर्व पंजाब | १५७ | १८१ | ६९ |
| दिल्ली | ३०९ | २९७ | २७० |
| मध्यप्रांत | ५९६ | ५१७ | ५४३ |
| बिहार | २८ | १९ | २१ |
| सिंध* | | ४ | २ |
| संस्थानें | १९९२ | २१८.२ | २२७.२ |
| एकूण | १३०३२ | १३३८० | १३२९७ |

**गुरांच्या अभावीं यंत्रचलित नांगर**—यंदा सौराष्ट्रांत पडलेल्या दुष्काळामुळें शेतीला उपयोगी पडणाऱ्या जनावरांची चणचण भासत आहे. गुरांची वाण १२ यांत्रिक नांगर अंशतः भरून काढणार आहेत. हे नांगर आणि त्यांना लागणारी इतर यांत्रिक अवजारें मिळून ४ लाख किंमतीची यंत्रसामुग्री सौराष्ट्र सरकार दुष्काळी भागांत वापरणार आहे.

**इंग्लंड जपानी कापड घेणार**—शर्टसाठी आणि अभ्र्यासाठी लागणाऱ्या कापडाचा तुटवडा असल्यामुळें ब्रिटिश सरकार खाजगी व्यापाऱ्यांना जपानहून १ कोटी वार कापड आयात करण्याची परवानगी देणार आहे. कापडाच्या जागतिक बाजारपेठेंत एकाकाळीं अग्रेसर असणाऱ्या ब्रिटनला आतां जपानहून कापड आयात करावें लागत आहे.

## ब्रिटनची कापडाचा व सुताची निर्यात

गेल्या कांहीं वर्षांतील, ब्रिटनच्या कापडाच्या निर्यातीचे तुलनात्मक आकडे पुढें दिले आहेत:—

| वर्ष | चौरस वार ( कोटी ) | किंमत ( पौंड ) ( कोटी ) | दर वाराची सरासरी किंमत (पेन्स) |
|---|---|---|---|
| १९३८ | १३८६ | ३.१९ | ५.५३ |
| १९३९ | १३९३ | ३.१९ | ५.५१ |
| १९४० | ९७५ | ३.२१ | ७.९० |
| १९४१ | ७८३ | २.९९ | ९.१७ |
| १९४२ | ४८५ | २.४३ | १२.०७ |
| १९४३ | ३७४ | २.०२ | १३.०० |
| १९४४ | ४३४ | २.४१ | १३.३६ |
| १९४५ | ४४१ | २.८७ | १५.९६ |
| १९४६ | ५१४ | ४.०३ | १८.८४ |
| १९४७ | ५३२ | ४.९६ | २२.३७ |
| १९४८ | ७६१ | ८.५७ | २७.०४ |

खालीं दिलेल्या तक्त्यांत सुताच्या निर्यातीचे तौलनिक आंकडे दिले आहेत:—

| वर्ष | सूत (कोटी पौंड) | किंमत (लाख पौंड) | दर पौंडाच सरासरी किंमत (पेन्स) |
|---|---|---|---|
| १९३८ | १२.२ | ९६.७ | १८.८८ |
| १९३९ | ११.३ | ८९.४ | १८.८९ |
| १९४० | ६.६७ | ७४.४ | २६.७९ |
| १९४१ | २.८८ | ४४.८ | ३७.२९ |
| १९४२ | १.८७ | ३३.९ | ४३.४४ |
| १९४३ | १.९२ | ३३.४ | ४१.७४ |
| १९४४ | १.९६ | ३२.८ | ४०.२० |
| १९४५ | १.६१ | २९.१ | ४३.४७ |
| १९४६ | १.९३ | ३७.८ | ४६.८८ |
| १९४७ | २.६६ | ६७.८ | ६१.०९ |
| १९४९ | ५.९० | १६७ | ६८.१३ |

## कंपनीचे अध्यक्ष म्हणाले :

### दि बँक ऑफ बरोडा

"ह्या देशाची मूळची अर्थव्यवस्था निरोगी आहे. त्यांतच सरकारनें आपल्या खर्चात कपात करण्याचें आश्वासन दिलें असल्यामुळें भविष्यकालाबद्दल आशा वाटूं लागली आहे. तथापि मला हें सांगितलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांत प्रत्यक्ष करांचे ओझें इतर कोठल्याही देशापेक्षां अधिक आहे. प्रत्येक नव्या अंदाजपत्रकाच्या वेळीं अप्रत्यक्ष करांच्या ऐवजीं प्रत्यक्ष कर बसविण्याकडे जो कल दिसून येतो, त्यामुळें देशाची कर व्यवस्था अधिकाधिक गुंतागुंतीची होत चालली आहे. कांहीं प्रांतिक सरकारें मध्यवर्ती सरकारच्या धोरणाशीं विसंगत असे कर बसवीत आहेत. मध्यवर्ती आणि प्रांतिक करांची तज्ज्ञाकडून तपासणी करवून घेवून सर्वच कर-व्यवस्था शास्त्रीय पायावर उभारण्याचें काम हातीं घेण्याची वेळ आतां आली आहे"

श्री. तुळशीदास किलाचंद

श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री



## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. दिमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.



—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्टें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर.

## राहण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न

### बँक ऑफ पूना लि. चा पुढाकार

मध्यम वर्गीय लोकांना रहाण्याची जागा मिळण्याचा प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे. तो सोडविण्याचा प्रयत्न करण्याचें कामीं बँक ऑफ पूना लि. नें पुढाकार घेऊन पुण्यांतील संपादक मंडळींशीं ता. ११ एप्रिल रोजीं चर्चा केली. बँकेचे वतीनें तिचे अध्यक्ष शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया ह्यांनीं चर्चेत भाग घेतला. घरें बांधावयाचीं, त्यांची किंमत मध्यम वर्गीयांच्या आटोक्यांत असावी; तीं शक्यतों गांवांतील रिकाम्या जागेंत किंवा वहातुकीचीं साधनें सहज मिळूं शकतील अशा ठिकाणीं गावाचे आसपास बांधण्यांत यावींत; देवस्थाने, ट्रस्ट, इत्यादींच्या जागा मिळविण्याचा प्रयत्न करावा; ह्या इमारतींचे बाबत नगरपालिकेचें सहकार्य मिळवावें; प्रमुख इंजिनिअर्स व नगरपालिकेचे अधिकारी ह्यांच्याशीं विचारविनिमय करावा; शेअर होल्डर्सची कंपनी काढून भाडेकरू व मालक एकच बनतील अशी योजना करावी; अशा प्रकारची चर्चा झाली. ह्याबाबत नागरिकांनीं बँक ऑफ पूना लि., ४५५, रविवार, पुणें, ह्यांच्या मॅनेजरकडे अधिक चौकशी करावी.

---

### सतलज नदीवरील 'नानगल' प्रॉजेक्ट

पूर्व पंजाबमध्यें सतलज नदीवर वीज निर्माण करण्यासाठी टरबाइन जनरेटर्स बसविण्यांत येणार आहेत, ते तयार करण्याची ऑर्डर वेस्टिंग हाऊस इलेक्ट्रिक इंटरनॅशनल ह्या अमेरिकन कंपनीस मिळाली आहे. १,१०,००० किलोवॅट निर्मितीच्या ह्या यंत्रसामुग्रीस ३ कोटी रुपये पडतील. ११,००० व्होल्टेजवर, सहा मैल अंतरावरील दोन ठिकाणीं वीज निर्माण केली जाईल आणि स्टेप अप ट्रॅन्सफॉर्मर्स तिचें व्होल्टेज १,३२,००० वर नेतील. तीन सबस्टेशन्स मार्फत वीज पुरवठा केला जाईल. तीन वर्षांत ह्या यंत्रसामुग्रीची घडण पुरी होईल. वेस्टिंग हाऊसचे इंजिनिअर यंत्रसामुग्री जागयावर आणून बसवून देतील. वीज निर्मितीच्या प्रस्तुत योजनेचें नांव "नानगल प्रॉजेक्ट" असें आहे. त्याचे चार टरबाइन्स ९८ फुटावरून पडणाऱ्या पाण्यानें फिरतील आणि प्रत्येक टरबाइनमधून दर सेकंदास ३,००० घनफूट पाणी खाली वाहून जाईल.

---

### निर्वासितांची सोय

हिंदुस्थान सरकारचे फडणीस डॉ. जॉन मथाई ह्यांनीं, निर्वासितांची सोय लावणाऱ्या सरकारी संस्थेनें ३१ डिसेंबर १९४८ रोजीं संपलेल्या महिन्यांत काय कार्य केलें त्याची माहिती हिंदी लोकसभेंत नुकतीच सांगितली. निर्वासितांची सोय लावणारी ही संस्था तद्विषयक कायद्यानुसार १ जून १९४८ रोजीं स्थापन करण्यांत आली. निर्वासितांना योग्य अटीवर आर्थिक मदत करून उद्योगधंद्यांत अगर व्यापारांत त्यांची सोय लावून देणें ह्यासाठी संस्थेला मध्यवर्ती सरकारकडून वेळोवेळीं पैसा पुरविला जातो. ही रकम जास्तींत जास्त १० कोटी रुपयांपेक्षां अधिक असणार नाहीं. संस्था ५ हजार रुपयांपासून ५०,००० रुपयांपर्यंत कर्जाची मागणी करणाऱ्या अर्जांचा विचार करूं शकते. सहकारी संस्था अगर कंपन्या ह्यांना जास्तींत जास्त १ लाख रुपयांपर्यंत कर्ज संस्थेकडून मिळण्याची सोय आहे. संस्थेला सल्ला देण्यासाठी एक बोर्ड असून त्यांत १२ सभासद असतात. प्रत्यक्ष कारभार संस्थेचा अध्यक्ष, मध्यवर्ती सरकारनें नेमलेले तीन सरकारी अधिकारी आणि सरकारनें नेमलेले तीन बिन–सरकारी सभासद ह्यांच्या मार्फत चालतो. संस्थेच्या शाखा सिमला, मुंबई, कलकत्ता आणि लखनौ येथें चालू महिन्याच्या सुरवातीपासून काम करूं लागणार होत्या.


# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ३०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३५,००,००० |

*—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी:— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई

(मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली).

स्थापन साल १९११

चेअरमन:-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५२ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## गुळाच्या उत्पादनाचा दर आधणी खर्च

संपादक "अर्थ" ह्यांस

सा. न. वि. वि.

रा. रा. फणसळकर यांनीं हल्लींचे गुळ करणेचे पद्धतीप्रमाणें होणारा दर आधणाचा खर्च दिला आहे. त्यांत खालील बाबी कमी होणें जरूर आहे. पाचट गोळा करणें व ते वाहून आणणें हें काम उस तोडणी व वहातुक यांत अंतर्भूत असतें. त्याचप्रमाणें हल्लीं बहुतेक ठिकाणीं २९ हॉ. पॉ. चे इंजिनवर वसंत नं. ३ किर्लोस्कर क्रशर व चार चुलवणे असा सरंजाम असतो, व त्याची किंमत रु. १६००० असते. म्हणजे घसारा म्हणून दर आधणी फक्त ०-८-० ( आठ आणे ) धरले पाहिजेत. म्हणजे हल्लींचे पद्धतींत दर आधणी पुढील प्रमाणें खर्च येतो.

| | रु. |
|---|---|
| फाळकेवाले | १-०-० |
| गुळव्या | १-०-० |
| जाळव्या | १-०-० |
| पेसळया ( दंडाळेवाला ) | ०-८-० |
| ड्रायव्हर व ऑइलमन | ०-५-० |
| मुकादम, कारकून | ०-४-० |
| चुलवणें, कढया दुरुस्तीवगैरे | ०-८-० |
| क्रूड ऑईल | ०-१४-० |
| पट्टा, ल्युब्रिकेटिंग ऑईल | ०-३-० |
| हायड्रास | ०-३-० |
| पढदा, एरंडेल, उडीद | ०-४-० |
| घसारा व किरकोळ मजुरी | ०-१५-० |
| | ७-०-० |

याप्रमाणें दररोज २४ ते ३० आधणें क्रशरवाले हल्लीं काढतात. यांत सुधारणा करणें असेल तर पांच लार्टीचा क्रशर वापरून जास्त रस काढणेची तजवीज व्हावी. म्हणजे स्वतःचा २५ एकर व भाडोत्री २५ एकर ऊस गाळणेचा धंदा चांगला चालेल. सद्य: परिस्थितींत २०० एकर स्वतःचा ऊस असणारे शेतकरी अपवादात्मकच आहेत. त्याचप्रमाणें दीड लाख भांडवलाचीं यंत्रें व ५०,००० रु. इमारती वगैरे असे २ लाख रुपये गुंतविलेला धंदा फक्त वर्षांतून चार महिनेच चालतो. तेव्हां आर्थिक दृष्ट्याही ही गोष्ट कितपत फायदेशीर होईल हा प्रश्नच आहे. भाडोत्री ऊस गाळणेस घेतल्यास दर आधणास २ रुपये तरी निव्वळ नफा रहातो. म्हणजे, क्रशरवाला आपले २५ एकर उसांत ४/ ४॥ हजार रुपयांची गाळणी खर्चात बचत करतो, व ४/ ४॥ हजार रुपये भाडोत्री गाळणींत नफा मिळवतो. म्हणजे तो एक उपधंदा म्हणून होईल. २०० एकरांचे युनिट केल्यास क्रशरवर उसाची वहातुक करणें फार खर्चाचें होईल. गूळ चांगला, केशरी, लाल, हिरवा वगैरे होणें हें पुष्कळ वेळा जमीन व उसास मिळणारें पाणी ( कॅनाल, विहीर अगर पाझर ) यावर अवलंबून असते. सँपलप्रमाणें साखर तयार होईल, परंतु गूळ होणं कठीण आहे.

एक गुळाळवाला.

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तु, इत्यादीसाठीं चौकशी कराः—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

५, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : २४५११

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ( ले:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन ( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ( ले :—. रवि अॅले, किं. २ रु. )

**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

स्थापना—१९१७

फोन नं. २४८३ तारेचा पत्ता "Cencobank" पोस्टबॉक्स नं. ५११

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२७ शिवाजीनगर ( पो. आ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.